
शिक्षणाच्या हक्कासाठी

मलाला यूसुफझाईचा लढा

लेखिका: रिबेका लँगस्टन-जॉर्ज

चित्रे: जॅन बॉक

मराठी: तृप्ती कर्णिक



शिक्षणाच्या हक्कासाठी

मलाला यूसुफझाईचा लढा

लेखिका: रिबेका लँगस्टन-जॉर्ज

चित्रे: जॅन बॉक

मराठी: तृप्ती कर्णिक




फक्त १७ वर्षांची व जेमतेम ५ फुट उंचीची पाकिस्तानी शाळकरी मुलगी, मलाला युसुफझाई, व्यासपीठावर बोलायला उभी राहिली. ती खूप धाडसी मुलगी होती. जगभरातील अनेक नेते तिचे भाषण ऐकायला अधीर होते. प्रतिष्ठित असा शांततेचा नोबेल पुरस्कार तिने ओस्लो, नॉर्वे इथे स्वीकारला आणि तिचा संदेश जगभरातल्या टीव्हीवर झळकू लागला.


तिच्या देशात जर एका मुलीने असे सर्वांसमोर भाषण केले असते तर तिला मारहाण झाली असती. पण मलाला घाबरली नाही. तिची ताकद, धैर्य आणि हिंमत वाखाणण्याजोगी होती. १० डिसेंबर २०१४ ला जेव्हा तिने नोबेल पुरस्कार स्वीकारला तेव्हा हा सन्मान मिळवणारी जगातील सर्वात लहान व्यक्ती ती ठरली. जगभरातील सर्व मुलांचा ती आवाज बनली.

"हा सन्मान फक्त माझा नाही आहे. तर हा पुरस्कार अशा प्रत्येक दुर्लक्षित मुलासाठी आहे ज्याला शिक्षण हवे आहे. हा पुरस्कार अशा प्रत्येक भयभीत मुलासाठी आहे ज्याला शांती हवी आहे. हा पुरस्कार अशा प्रत्येक दबलेल्या मुलासाठी आहे ज्याला बदल हवा आहे."

मलाला समान शिक्षण चळवळीचा आवाज बनली होती. ह्यासाठी तिने आपले आयुष्य पणाला लावले होते.



मलालाचे स्वत:चे शिक्षण तसे लवकरच सुरु झाले. तिचे वडील, झियाउद्दीन युसुफझाई पाकिस्तानातील बर्फाच्या डोंगरांनी वेढलेल्या स्वात खोऱ्यातील मिंगोरा गावात शाळा चालवायचे. पाय फुटले तेव्हापासून मलाला शाळेत जाऊ लागली. खेळातही ती छोटी शिक्षिका बनायची. तिला शाळा प्रचंड आवडायची.




परंतु पाकिस्तानातील सगळी मुले मलालासारखी भाग्यवान नव्हती. अनेक कुटुंबांना शाळेची फी परवडत नसे. काहीजण फक्त मुलगा असेल तरच शाळेत पाठवायचे. बऱ्याच पालकांचे मत होते की मुलींना शाळेची काय गरज? स्वयंपाक करणे आणि घर सांभाळणे हीच त्यांची कामे.




मलालाची आईही लहान असताना शाळेत गेली नव्हती. परंतु मलालाचे वडील मात्र मुलगा-मुलगी असा भेद मानत नव्हते. दोघांनाही शिक्षणाचा समान हक्क आहे अशा मताचे ते होते. त्यांची इच्छा होती की मलाला आणि तिचे लहान भाऊ कुशल आणि अटल ह्यांनी खूप शिकावे. त्यांच्या शाळेत येणाऱ्या अनेक गरीब मुलांना ते मोफत शिकवीत.

मलाला शाळेत चमकत होती. ती खूप मेहनती होती. तिला अनेक बक्षिसे आणि पदके मिळाली होती. पश्तू भाषा लिहिण्या-वाचण्यात ती प्रवीण होतीच पण इंग्लिश व उर्दू भाषाही तिला सफाईदार बोलता यायच्या.








परंतु तालिबान्यांचे त्या भागावर नियंत्रण होते आणि मुलींनी शाळेत जायला त्यांचा विरोध होता. त्यांनी फतवा काढला की स्त्री आणि पुरुष बाहेर वेगवेगळे असतील. त्यांना मुलींचे शिक्षण बंद करायचे होते. पूर्ण शरीर व चेहरा झाकला जावा ह्यासाठी स्त्रियांना बुरखा घालायला ते जबरदस्ती करत होते.

तालिबानच्या लोकांनी शाळाचालकांना धमकावले. झियाउद्दीन ह्यांच्या शाळेला मुले आणि मुलींसाठी एकच प्रवेशदार होते त्यामुळे त्यांनी झियाउद्दीनना शाळा बंद करण्याचा आदेश दिला. त्यांनी तो धुडकावून लावल्याने तालिबानने शाळेतील शिक्षकांना धमक्या द्यायला सुरुवात केली. भीतीने बरेच शिक्षक शाळा सोडून गेले.





झियाउद्दीन त्याने चिंतित झाले परंतु मलाला मात्र शांत होती. “स्वातच्या मुली कुणालाच घाबरत नाही.” शाळेत जायचा तिचा निश्चय आणखीन दृढ झाला. शाळेच्या सुट्ट्या सुरु झाल्या की पाकिस्तानमधील मुली-बायका हातावर फुला-पानांची मेंदी काढायच्या. मलाला मात्र हातावर मेंदीने विज्ञानातील सूत्रे लिहायची.

दहशत आणि हिंसाचाराच्या बळावर तालिबानची ताकद वाढत चालली होती. त्याबरोबरीने त्यांचे नियम अधिकाधिक जाचक होऊ लागले होते. पुरुषांनी दाढी करायची नाही. बायकांनी चेहरा पूर्णपणे झाकून घ्यायचा. सिनेमांना बंदी... स्वात खोऱ्यातील रेडीयोवर दिवसभर तालिबानी सूचना घोंगावत असायच्या.





मलालाच्या इलाख्यात भीतीचे वातावरण पसरले होते. एकेकाळी ओसांडून वाहणारे शाळेचे वर्ग आता ओस पडत चालले होते. तालिबानच्या जबरदस्तीने ज्या मुलींनी शाळा सोडली त्यांची नावे ते रेडीयोवर जाहीर करत. “शाळेत जाणे बंद केल्याबद्दल आदब तरीनचे अभिनंदन!"





झियाउद्दीननी त्याविरुद्ध आवाज उठवला. शिक्षण किती महत्वाचे आहे हे सांगण्यासाठी त्यांनी टीव्हीवर एक कार्यक्रम केला. मलालाही सोबत होती. जेव्हा बातमीदाराने मलालाला तिचे मत विचारले, तेव्हा ती म्हणाली, “शिक्षणाचा माझा मुलभूत हक्क काढून घेण्याची तालिबानची हिंमत कशी झाली? ”


थोड्याच दिवसात शाळेच्या गेटवर एक पत्रक चिकटवले गेले. “...तुमची शाळा पाश्चात्य पद्धतीची आहे...तुम्ही मुलींना शिकवता...थांबवलं नाही तर हे तुम्हाला महागात पडेल...”



मलाला ह्या धमक्यांनी अजिबात घाबरली नाही. ती आणि तिचे वडील मुलामुलींच्या समान शिक्षणाच्या हक्काबद्दल आवाज उठवतच राहिले. त्यांनी संस्थांशी संवाद साधला, वर्तमानपत्रात पत्रे लिहिली, पत्रकारांशी बोलले. मलालाने आवाज उठवला, "जर नवीन पिढीच्या हातात आज पेन दिले नाही तर अतिरेकी त्यांना बंदुका चालवायला लावतील.

परंतु परिस्थिती अजून चिघळली. तालिबानचे लोक बंदुका घेऊन रस्त्यांवर गस्त घालू लागले. त्यांचे न ऐकणाऱ्याला ते मारहाण करीत. रात्री बॉम्बचा वर्षाव व्हायचा. तालिबानचे नियम न पाळणाऱ्या व्यावसायिकांची दुकाने रात्रीत उध्वस्त करून टाकीत.

आणि डिसेंबर २००८ मधे ती भयानक बातमी रेडियोवर प्रसारित झाली, "मुलींच्या सर्व शाळा बंद करण्यात येतील. १५ जानेवारीनंतर मुलींचे शाळेत जाणे पूर्ण बंद." दहशत बसावी यासाठी जाहीर केलेल्या तारखेआधीच शाळेच्या जवळपास बॉम्ब फेकण्यात येऊ लागले.






बॉम्बहल्ल्यांचा मलालावर काहीही परिणाम झाला नाही. बीबीसीला मुलीकडून शाळाबंदीवर ब्लॉग लिहून हवा होता. शिक्षणाचा हक्क नाकारला जातोय ह्याबद्दल त्या शाळेतील मुलीचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना हवा होता. तुरुंगात जावे लागेल, मार बसेल, बॉम्ब फेकले जातील ह्या भीतीने मलालाच्या सगळ्या मैत्रिणीनी सपशेल नकार दिला. मलालाने मात्र लिहिले.

ब्रिटिशांच्या अत्याचारांविरुद्ध फार पूर्वी लढा दिलेल्या “गुल मकाई” ह्या पाकिस्तानी लढवय्यीचे नाव मलालाने आपले टोपणनाव म्हणून घेतले. पाकिस्तानातील इंटरनेट आणि वीज बेभरवशाची होती. म्हणून गुल मकाई बीबीसीच्या वार्ताहराशी फोनवर बोलायची. त्याने त्या संभाषणावर पहिल्या दोन महिन्याचे ब्लॉग लिहिले. ३ जानेवारी २००९ रोजी सर्वप्रथम उर्दू ब्लॉग प्रसिध्द झाला. मलालाचा तो ब्लॉग लोकांना प्रचंड आवडला म्हणून बीबीसीने त्याचे इंग्रजी भाषांतरही प्रसिध्द केले.




१४ जानेवारी २००९ ला तिने दुसरा ब्लॉग लिहिला. “मला खात्री आहे की शाळा पुन्हा सुरु होतील. पण निघताना जेव्हा मी शाळेचा निरोप घेतला तेव्हा मला का कोण जाणे पण असे वाटले की मी परत नाही येऊ शकणार.” मलाला दु:खी होती तरीही ठामपणे म्हणाली, ”ते आम्हाला शाळेत जाण्यापासून थांबवू शकतील पण शिकण्यापासून मात्र कधीही थांबवू शकणार नाही.”



मलालासारख्या लढवय्या मुली अजून अजून आक्रमक झाल्या. त्यामुळे तालिबान्यांनी दहा वर्षे आणि त्या खालील वयाच्या मुलींना शाळेत जायला परवानगी दिली. परंतु मलाला अकरा वर्षांची होती. ती व तिच्या मैत्रिणी शाळेच्या युनिफॉर्मऐवजी घरचे कपडे घालून, पुस्तके दुपट्ट्याखाली लपवून घराबाहेर पडल्या. आहोत त्यापेक्षा कमी वयाचे आहोत असे त्यांनी भासवले. जर कुणाला ह्याची कुणकुण लागली तर मात्र खूप धोकादायक होते. पकडल्या गेल्या तर विद्यार्थिनी आणि शिक्षकांना सगळ्यांसमोर फटके बसले असते किंवा ठार मारले गेले असते.

दिवसेंदिवस परिस्थिती बिघडत चालली होती. पाकिस्तानी आर्मीने तालिबान्यांवर हल्ला केला. बंदुकीचा धूर आणि किंकाळ्याच्या आवाजांनी आसमंत भरून गेला होता. कुणीही अगदी धीट शाळकरी मुलीही रस्त्यावर येण्याचे धाडस करत नव्हत्या. मे २००९ मध्ये आर्मीने तिथल्या सगळ्या लोकांना घरे सोडून जायला सांगितले. मोटारी, ट्रक, मोटारसायकली, तट्टूगाड्या आणि त्यावर खच्चून बांधलेले सामान ह्यांनी रस्ते फुलून गेले. स्वातमधील दोन लाख लोक निघून जाताना बंदुकधारी तालिबानी सैनिक लांबून पाहत होते.

छोट्या बॅगेत कपडे भरत असताना मलालाच्या गालावरून अश्रू ओघळले. ती पुस्तके काढायला लागली तेव्हा आईने सांगितले की आता आणखी काही घ्यायला अजिबात जागा उरली नाही आहे. तिला प्रचंड वाईट वाटले. आपण परत येऊ तोपर्यंत पुस्तके सुरक्षित राहावी ह्यासाठी तिने प्रार्थना केली. मलालाचे आई-बाबा आणि भाऊ शेजाऱ्यांच्या गाडीमधे कसेबसे जीव मुठीत घेऊन बसले. मलालाला तिच्या मैत्रिणीच्या गाडीत कोंबले. तालिबान्यांनी तिचे शिक्षण, तिचा आवाज, तिचे हक्क सारे काही हिरावून घेतले होते. तिने प्रार्थना केली की निदान आपल्या घरावर तरी त्यांची नजर पडू नये.



सारे निर्वासित स्वात खोऱ्याच्या बाहेर असलेल्या गावांमध्ये आले. संयुक्त राष्ट्रांनी निर्वासितांच्या राहण्यासाठी छावण्या उभारल्या होत्या पण त्या लगेच भरून जायच्या. पुरेशी स्वच्छता नसल्यामुळे तिकडे आजार पसरले होते. तालिबान छावण्यावर हल्ला करणार आहेत अशा अफवा उठल्या की लोक खूप घाबरून जायचे. नातेवाईकांच्या घरात राहण्याची सोय झाल्यामुळे तसे युसुफझाई कुटुंब भाग्यवान होते. पण ज्या शेजाऱ्यांच्या गाडीतून ते मिंगोरा सोडून आले त्यांना मात्र दुसरीकडे जावे लागले. स्वत:ची गाडी नसल्यामुळे धुळीने भरलेल्या रुक्ष रस्त्यांवरून सोळा तास ते चालत होते.





जुलैमधे मलालाचा बारावा वाढदिवस होता पण ह्या तणावामुळे ते कुणाच्या लक्षात देखील नव्हते. त्यामुळे कसला केक आणि कसली पार्टी! पण मलालाने मात्र शांती पसरावी ह्यासाठी प्रार्थना केली.

तीन महिन्यांनी ते घरी परत आले. लढाई संपली होती. पण मिंगोराची पार रया गेली होती. दुकाने उध्वस्त झाली होती. गाड्यांचे सांगाडे रस्त्यावर पडले होते. शाळेच्या भिंती बंदुकांच्या गोळ्यांनी ढासळल्या होत्या. तालिबान मात्र सोडून गेले होते. काही दिवसांतच युसुफझाईंनी शाळा सुरु केली. मुला मुलींचे वर्ग पुन्हा सुरु झाले.





मलाला पुन्हा शाळेत जाऊ लागली पण आता सगळेच बदलले होते. मुलींनी शाळेत जाऊ नये म्हणून तालिबानने केलेला प्रयत्न आता जागतिक प्रसारमाध्यमांचा विषय झाला होता. शेजारी आणि मित्र-मैत्रिणींना मलालाच गुल मकाई आहे ह्याचा अंदाज आला होता. ब्लॉग्स, भाषणे, मुलाखती ह्यामुळे आता आंतरराष्ट्रीय पातळीवर मलालाचे नाव झाले होते. दक्षिण आफ्रिकेच्या आर्चबिशप देशमंड टूटू ह्यांनी एक पुरस्कारासाठी तिचे नामांकन केले होते. पाकिस्तानने तिच्या कामाची दखल म्हणून राष्ट्रीय शांतता पुरस्काराचे नाव बदलून मलाला शांतता पुरस्कार केले. २०११च्या वर्षाअखेरीस मलालाचे आयुष्य टीव्ही, रेडियो, वर्तमानपत्रातील मुलाखती ह्यांनी व्यापून गेले होते. तिची छबी आता सगळ्यांना परिचित झाली होती.

परंतु लवकरच मलालाला समजले की तालिबान अजून तिथून निघून गेले नव्हते. तालिबानच्या नेत्यांनी तिला इंटरनेटवरून धमक्या द्यायला सुरुवात केली. तिचे नाव त्यांच्या हिटलिस्टवर होते. सुरक्षितेसाठी पोलिसांनी युसुफझाई कुटुंबाला घर सोडून जाण्याचा इशारा दिला.


पण मलालाने लपून राहण्याला नकार दिला.

तिने गप्प बसायलाही नकार दिला.




मलालाची आई तोरपकाईला तिच्या जीवाची खूप काळजी वाटायची. शाळा घरापासून जवळ होती तरीही ती मलालाला स्कूलबसनेच पाठवायची. मनात भीती असली तरी तिला आपल्या मुलीचा खूप अभिमान वाटायचा. मलालाने तिच्या आईलाही शाळेत जाण्यासाठी तयार केले. ९ ऑक्टोबर २०१२ ला तोरपकाईचा पहिला वाचनाचा वर्ग होता.


तोरपकाई आपल्या पहिल्या वर्गासाठी शाळेत आली आणि त्याच वेळी मलाला व तिच्या मैत्रिणी स्कूलबसमधून घरी जाण्यासाठी निघाल्या. बसमधे त्या सगळ्या गाणी म्हणत होत्या, खिदळत होत्या आणि अचानक त्यांची बस थांबवली गेली. तोंड झाकलेला एक माणूस आत आला.



कुणी काहीच उत्तर दिले नाही. पण काळजीने त्यांच्या नजरा त्यांच्या मैत्रिणीच्या दिशेने वळल्या. तेवढे पुरेसे होते. त्या माणसाने मलालावर बंदूक रोखली.




शांततेचा भंग करीत तीन गोळ्या सुटल्या.



बसड्रायव्हरने वाऱ्याच्या वेगाने बस चालवत मलाला आणि जखमी झालेल्या शाझिया आणि कैनात ह्या तिच्या मैत्रीणीना हॉस्पिटलमधे दाखल केले. खूप वेळ गोंधळ चालू होता. जसजशी बातमी पसरली तसतसे झालेल्या घटनेचे वार्तांकन करण्यासाठी वार्ताहर हॉस्पिटलमध्ये जमा झाले. झियाउद्दीन ह्यांचा फोन वाजला तेव्हा ते शाळेतल्या शिक्षकांना भाषण देत होते. ते लगोलग हॉस्पिटलमध्ये धावले. जमलेल्या जमावाला त्यांनी मलालासाठी प्रार्थना करण्याची विनंती केली.

तोरपकाई घरी परतली तर वाईट बातमी सांगण्यासाठी घरात ही गर्दी. तेवढ्यात तिच्या मैत्रिणीचा फोन आला की मलालाला हेलिकॉप्टरने दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये नेत आहेत. तोरपकाई आणि शेजारी मलालाचे हेलिकॉप्टर पाहण्यासाठी गच्चीवर धावले. तिने आपला डोक्याचा रुमाल आकाशाकडे भिरकावला आणि म्हणाली, “देवा तुझ्या हातात मी मलालाला सोपवत आहे.”





अनेक तास-दिवस उलटून गेले पण मलाला अजून बेशुध्दच होती. तिच्या मेंदूला सूज आली होती. खूप दिवस कोमात असल्याने तालिबान नेत्यांनी घोषणा केली की मलाला मेल्यात जमा आहे. मात्र काही चमत्कार होऊन ती वाचली तर ते तिला परत मारून टाकतील.


डॉक्टरांनी मेंदूची सूज कमी व्हावी ह्यासाठी ऑपरेशन केले. परंतु त्यानंतर जीवघेणे इन्फेक्शन झाले. त्यामुळे मलालाला इंग्लंडला बर्मिंगहॅम शहरातील हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. आणि इकडेही तिच्यावर तालिबान कधीही हल्ला करू शकतील ही भीती होतीच.

तालिबानने मलालाला गोळ्या झाडल्याची बातमी आतापर्यंत जगाच्या कानाकोपऱ्यात पोचली होती. इतक्या लहान मुलीने शिक्षणासाठी आपल्या जीवाची बाजी लावली होती. लोकांनी तिला बरे वाटावे म्हणून हजारो शुभेच्छापत्रे पाठवली. फुले, सॉफ्ट टॉईजचा अशा भेटवस्तूंचा पूर रोज हॉस्पिटलमध्ये येत होता. पण खरं सांगायचं तर मलालाला सगळ्यात जास्त ओढ वह्या-पुस्तकांची होती.



पुढील काही दिवस डॉक्टरांनी मलालाच्या अनेक शस्त्रक्रिया केल्या. तिचा मिटलेला डोळा व चेहरा ठीक व्हावा, तिला हसता यावे ह्यासाठी शस्त्रक्रिया कराव्या लागल्या. ऐकू येण्यासाठी तिच्या कानांत मशीन घातले. उपचारांसाठी तिला तीन महिने हॉस्पिटलमध्ये राहावे लागले. त्या काळात तिच्या मैत्रिणीनी शाळेतील तिचे बाक तिच्यासाठी रिकामे ठवले होते.

बंदुकीच्या गोळ्या मलालाचा आवाज जास्त दिवस बंद नाही करू शकले. १२ जुलै २०१३ रोजी तिने संयुक्त राष्ट्रामध्ये जगभरातील नेत्यांसमोर भाषण केले. तिने घोषणा केली, “एक मूल, एक शिक्षक, एक पुस्तक आणि एक पेन संपूर्ण जगाचा कायापालट करू शकते.” शिक्षणाच्या हक्कासाठी धाडसाने लढा देणाऱ्या त्या मुलीला उपस्थित असलेल्या समुदायाने उभे राहून मानवंदना दिली.




मलालाविषयी अधिक तपशील


पश्चिम पाकिस्तानातील स्वात खोऱ्यात मलालाचे घर आहे. तिथून अफगाणिस्तान जवळ असल्यामुळे दोघांचे एकमेकांशी सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या जवळचे संबंध आहेत. ९ सप्टेंबर २०११ मध्ये अतिरेक्यांनी अमेरिकेवर हल्ला केला त्याचे प्रत्युत्तर म्हणून अमेरिका आणि त्यांच्या सहकारी राष्ट्रांनी अफगाणिस्तानमध्ये आपले सैन्य पाठवले. तालिबान त्या भागात चांगलेच ताकदवान झाले होते. तसेच बाजूच्या स्वात खोऱ्यातही तालिबानांनी आपले हातपाय पसरवले होते आणि तिथल्या लोकांवर आपले नियम लादले होते.

मलालाला डाव्या डोळ्याच्या खोबणीत मारलेली गोळी झपकन डोळ्यातून चेहऱ्यात आणि तिथून खांद्यात अडकली. सुरुवातीला डॉक्टरांना वाटले की जखम खोलवर नसावी. परंतु नंतर त्यांच्या लक्षात आले की तिच्या जीवाचे काहीही बरेवाईट होऊ शकते. तिचा मेंदू, चेहऱ्यावरच्या नसा आणि कान खराब झाले होते. तिच्या मेंदूला आलेली सूज कमी करण्यासाठी डॉक्टरांना कवटीचा थोडा भाग काढून टाकावा लागला. नंतर कवटीच्या हाडाच्या जागी त्यांनी धातूची पट्टी घातली. शाझिया आणि कैनात ह्या तिच्या मैत्रीणींना किरकोळ लागले होते.

बर्मिंगहॅम, इंग्लंडमधील हॉस्पिटलमध्ये तिच्यासाठी इतकी शुभेच्छापत्रे आणि भेटवस्तू आल्या की ते ठेवायला जागा अपुरी पडली. तिने त्यातील एक भेटवस्तू मात्र जपून ठेवली. बेनझीर भुत्तोंच्या मुलांनी त्यांच्या आईच्या दोन शाल पाठवल्या, बेनझीर भुत्तो पंतप्रधान असतानाच त्यांची हत्या झाली होती. मलाला त्यांना नेहमी आदर्श मानायची. सयुंक्त राष्ट्रात भाषण करताना तिने मोठ्या अभिमानाने त्यांची पांढरी शाल आपल्या खांद्यावर पांघरली होती.

तिच्यावर झालेल्या गोळीबारानंतर साधारण दोन वर्षांनी पाकिस्तान आर्मीने १० माणसांच्या गटाला अटक केली. परंतु तरीही तालिबान तिला सतत धमक्या पाठवत होते. मलाला काही महिन्यांनी शाळेत परत आली. परंतु तालिबानांच्या धमक्यांमुळे मिंगोरामधील वर्गात ती बसू शकली नाही. ती व तिचे कुटुंब बर्मिंगहॅमला राहायला गेले. तिचे शिक्षण तिथे सुरु झाले. भविष्यात ती पाकिस्तानात बंदुकीचे उत्तर म्हणून विद्या घेऊन परतणार होती. शिक्षणाचे महत्व ह्यावर ती व तिच्या वडिलांनी बोलणे चालूच ठेवले. पाकिस्तानसारख्या देशातील शिक्षणासाठी पैसा गोळा करण्यसाठी तिने एक संस्था सुरु केली. तिने “घराघरात शांतता” आणि “प्रत्येक मुलगा आणि मुलीसाठी शिक्षण” ह्या गोष्टीसाठी आयुष्यभर काम करण्याचा निर्धार केला.




“एक मूल, एक शिक्षक, एक पुस्तक आणि एक पेन
संपूर्ण जगाचा कायापालट करू शकते."
-मलाला यूसुफझाई